# सुखकर्ता दुखहर्ता आरती

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची । कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।।१।।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रे मनःकामना पुरती ।धृ।।
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चन्दनाची उटी कुंकुमकेशरा ।।
हिरेजडित मुगुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ।।२।।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रे मनःकामना पुरती ।।धृ।।
लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।। दास रामाचा वाट पाहे सदना । संकष्टी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ।।३।। जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रे मनःकामना पुरती ।।धृ।।